अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १७१ ■ रविवार दि.९ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 171 ■ Sunday Dt. 9 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## सदभावना यात्रेस जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र काँग्रेसने पुढाकार घेऊन सुरू केलेल्या सद्भावना यात्रेचा पहिला टप्पा महिला दिन म्हणजे ८ मार्च रोजी बीड जिल्ह्यातून सुरू झाला. केज तालुक्यातील मस्साजोग ते बीड अशा सद्भावना पद यात्रेला सुरुवात झाली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खा. रजनी पाटील यांच्या मार्गदर्शनातील सद्भावनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. काल नेकनूर येथे मुक्कामानंतर ही यात्रा आज बीडमध्ये दाखल झाली. कालपासून निघालेल्या या यात्रेचे वाटेत नागरिकांकडून जागोजागी स्वागत करण्यात आले. या यात्रेमुळे आणि जनतेकडून मिळालेल्या प्रतिसादाने कचिस कार्यकत्यांमध्ये उत्साह संचारला असल्याचे दिसून आले.

केज तालुक्यातील मस्साजोग कथे शनिवारी सकाळी नऊ वाजता सद्भावना पद यात्रेला सुरुवात झाली. यावेळी सर्वप्रथम स्व. संतोष देशमुख यांना आदरांजली वाहून छत्रपती शिवाजी महाराज तसेच महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यानंतर सेवा दलाचे ध्वजारोहण संपन्त्र झाल्यानंतर पदयात्रा बीडकडे मार्गस्थ झाली. यावेळी या पदयात्रेसाठी सुमारे पाच हजार नागरिकानी सहभाग नोंदवला आणि प्रत्यक्ष पद महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस प्रदेशाध्यक्ष याच्या मार्गदर्शनाखाली ही पदयात्रा सुरु आली आहे. सदरील पदयात्रा यशस्वी करण्यासाठी बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहल सोनवणे यांनी मोठया प्रमाणावर संघटन करून आणि परिश्रमा घेऊन पदयात्रेतील आधा प्या हर्षवर्धन सपकाळ याची पदयात्रेसबधी असलेली संकल्पना यावेळी दिसून येता होती. यात्रला सुरुवात झाल्यानंतर विकठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाद यात्रेचे स्वागत झाले आणि आजूबाजूच्या गावातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर पदयात्रेमध्ये सहभाग नोंदवला.

# खोक्याला वाचवणाऱ्या आ. सुरेश धसांना सहआरोपी करा?

## खोक्या प्रकरणात आ. सुरेश धस अडचणीत?

### ढाकणे कुटुंबाच्या मारहाणीच्या निषेधार्थ आणि खोक्याला तात्काळ अटक करण्याची मागणी!



**बीड । प्रतिनिधी**

ढाकणे कुटुंबावरील हल्ल्याच्या निषेधार्थ आज शिरूर कासार बंद करण्यात आलं आहे. सतीश भोसलेला अटक करण्याची आणि एसआयटी चौकशी करण्याची मागणी मोर्चेकऱ्यांकडून केली जात आहे. आरोपीला वाचवण्यात आमदार सुरेश धस यांचा सहभाग असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला आहे. या मोर्चात शेकडो लोक सहभागी झाले असून सहा मागण्या करण्यात आल्या आहेत. शिरूरकासार येथील सतीश भोसले उर्फ खोक्या भाई याच्यावर गुन्हा दाखल होऊन देखील तो अद्याप फरार आहे. ढाकणे कुटुंबाच्या मारहाणीच्या निषेधार्थ आणि खोक्याला तात्काळ अटक करा, या मागणीसाठी आज शिरूर शहर बंदची हाक देण्यात आली आहे. तसेच येथील पोलीस ठाण्यावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चात शेकडो लोक सहभागी झाले आहेत. या मोर्चामध्ये ओबीसी नेते लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांच्या सह अनेक जन सहभागी झाले आहेत. सकाळी ९ वाजता हा आक्रोश मोर्चा निघाला आहे. आरोपीला वाचवणाऱ्या भाजप आमदार सुरेश धस यांना सहआरोपी करा, अशी मागणी या मोर्चेकऱ्यांनी केली आहे. या मोर्चात एकूण सहा मागण्या करण्यात आल्या.



### मोर्चेकऱ्यांच्या मागण्या

■ सतीश भोसले उर्फ खोक्या आणि त्याचे सहकारी हरणाची तस्करी करणे, त्यातून भरपूर पैसे कमवणे हा मुख्य व्यवसाय करतात. त्यासाठी त्याला वनविभागाचा राजकीय वरदहस्त असून या सर्व प्रकरणाची चौकशी करावी. तसेच वन्यजीव कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा.

■ ढाकणे कुटुंबीयाला मारहाण झाल्यानंतर शिरूर पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक धोकरट यांनी ढाकणे कुटुंबाची तक्रार घेतली नाही.

■ यामुळे ढाकणे कुटुंबाला पोलीस अधीक्षकांकडे जावे लागले. परंतु त्या ठिकाणीही तक्रार घेतली नाही, याबाबतची चौकशी करावी.

■ या सर्व घटनाक्रमामध्ये ओबीसी समाजाच्या गरीब कुटुंबावर पोलीस प्रशासनाकडून अन्याय कोणाच्या दबावाखाली झाला. याबाबतची चौकशी करावी.

■ आमदार सुरेश धस आरोपीस वाचवण्यासाठी उघड सहकार्य करत असल्याचे दिसून येत असताना त्यांना सहआरोपी करावे.

■ यासह सतीश भोसले यांचे आणखी कुठले अवैधधंदे आहेत. या सर्वांचा शोध घ्यावा.

या मोर्चात ढाकणे कुटुंबीयही सहभागी झाले होते. यावेळी महेश ढाकणे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. सतीश भोसलेची एसआयटी चौकशी करा. आम्हाला राहायची भीती वाटते रात्रभर झोप येत नाही. माझ्या वडिलांचे दात पडलेत, माझा पाय फॅक्चर झालाय. त्याने कमीत कमी २०० हरणं मारले आहेत. त्यामुळे त्याची डखढ चौकशी व्हायला पाहिजे. त्याला लवकरात लवकर अटक करा. आमच्या जीवाला पुन्हा धोका आहे, असं महेश ढाकणे म्हणाले.

आम्हाला त्याबाबत काही माहिती नाही, पण सतीश भोसले आम्हाला मरण्याच्या अवस्थेत टाकून गेला होता. ज्या लोकांनी आमच्यावर हल्ला केला. त्या सगळ्यांना लवकरात लवकर अटक व्हावी. सतीश भोसले खड्डे करून काय काय पुरलं आहे याची चौकशी व्हावी. त्यादिवशी सुद्धा तो हरण मारून स्कार्पियो गाडीतून घेऊन गेला आहे, मी माझ्या डोळ्याने बघितल आहे, असंही महेश म्हणाले.




दिलीप ढाकणे यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. मोर्चात सहभागी झालेल्या सगळ्यांचा मी आभारी आहे, आम्हाला एवढं मारलं याचा आम्हाला कमी दुःख आहे. मला सगळयात जास्त दुःख आहे हरिण वन्य प्राणी मारल्याचं. मी त्यांना आडवा गेलो म्हणून मला एवढं मारलं. मानवावर एवढा हल्ला करतात तर मुक्या प्राण्यावर कसा हल्ला करत असतील याचा विचार करा. आमची एकच मागणी आहे या सर्व आरोपींना कडक शासन झालं पाहिजे, असं दिलीप ढाकणे म्हणाले.

## भगवानगडाला पौंडूळ (क्र.३) ग्रामस्थांनी दिली ५६ लाख रुपये रोख देणगी

### अवाढव्य खर्चाचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन



**भगवानगड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गापैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे पौंडूळ नं.३ (ता.शिरुर कासार,जि.बीड) येथे काल्याच्या कीर्तनानिमित्त आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापली देणगी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री यांच्याकडे रोख स्वरूपात जमा केली. जमा केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ५६ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## माजलगाव न.प. मधील बांधकाम विभागमध्ये करोडोचा भ्रष्टाचार

### संबंधित अधिकाऱ्यावर तात्काळ गुन्हे दाखल करा : शेख रशिद

**माजलगाव । प्रतिनिधी**



माजलगाव नगरपरिषद मधील बांधकाम विभाग मध्ये करोडोचा भ्रष्टाचार झाला असुन संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करुन गुन्हे दाखल करा व माहिती अधिकार कायदा अंतर्गत माहिती देण्यात टाळाटाळ करण्यावर कार्यवाही करा नसता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी दिला आहे.

माजलगाव नगरपरिषद मध्यील बांधकाम विभागला शासकीय मान्यताचे सिमेंट रस्ते, नाले अश्या वेगवेगळ्या कामांसाठी ५० करोडो कामे कंपनी, गुत्तेदारांना देतांना करोडो रुपयांचे भ्रष्टाचार झालेला आहे तसेच अंदाजपत्रकानुसार सिमेंट रस्ते,नाल्यांचे कामे पुर्णपणे बोगस झाले आहे. संबंधित अधिकार्यांनी लोकप्रतिनिधीच्या कार्यकर्तेना कामे देऊन मनमानी कारभार सुरू केलेला आहे तसेच विधानसभा निवडणुकी पुर्वी ठरावे, कोणत्या योजनांतर्गत सिमेंट रस्ते, नाले यांचे अंदाजपत्रक, शिफारसपत्र, विवरणपत्र, कंपनी, गुत्तेदार अशी माहिती देण्यात टाळाटाळ करण्यात येत आहे त्यामुळे माजलगाव नगरपरिषद मधील बांधकाम विभाग मध्ये करोडोचा भ्रष्टाचाराच्या विरोधात तसेच माहिती अधिकार कायदा अंतर्गत माहिती देण्यात टाळाटाळ करण्यांच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी दिला आहे.

# वडिलांचे स्वप्न लेकाने केले पूर्ण!

## ब्रह्मगावच्या महिलांच्या डोक्यावरील पाण्याची घागर उतरली! गावाकर्यात समाधान

बीड । प्रतिनिधी

दोन पंचवार्षिक पूर्वी सुभाष डावकर यांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याने त्यांचे गावातील लोकांना पाणी पुरवण्याचे स्वप्न अधुरं राहिलं होतं. त्यानंतर त्यांचे चिरंजीव सरपंच संदीप सुभाष डावकर यांनी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून ही योजना मंजूर करुन घेवून शिवनी ते मौज ब्रह्मगाव या सात किलोमीटर अंतरावर ही पाईपलाईन असून मौज-ब्रह्मगावच्या नागरिकांना पाहिजे तितका पाणी पुरवठा होत असल्याने मौज, ब्रह्मगावच्या महिलांच्या डोक्यावरील पाण्याची घागर उतरल्यामुळे नागरीकातून समाधान व्यक्त केल्या जात आहे.



बीड तालुक्यातील ब्रम्हगाव आणि मौज या दोन गावची ग्रामपंचायत एक आहे. गेली कित्तेक दशके या गावच्या पिण्याच्या पाण्याची समास्या गंभीर होती. गावाला पाणी पुरवठा करणारी एकच विहीर या विहिरीला फेब्रुवारी महिन्यातच तळगाटावा लागायचा, अल्प-पाणी साठ्यामुळे गावातील नागरिक पाण्यासाठी भटकंती करायचे तर रानोमाळ महिलांच्या डोक्यावरचे हंडे आणि घागर ही वर्षानुवर्षे डोक्याच्या खाली उतरलीच नव्हती, अतिशय वेदना सहन करणार्या या गावचा आता वनवास संपुष्टात आला आहे. ब्रह्मगाव या ठिकाणी यापूर्वी पाणीपुरवठा योजना राबवल्या मात्र या योजनेचे कामही झाले परंतु ज्या ठिकाणाहून पिण्याचे पाणी मिळायचे त्या ठिकाणी पाणीच नाही; 'मग आडातच नाही पोहर्यात कुठून येणार' अशी परिस्थिती या गावच्या नागरिकांची झाली होती. दिवसेंदिवस या गावच्या महिलांना आणि नागरिकांना पाण्यासाठी वन-वन फिरायची वेळ आली होती; गंभीर समस्या उद्भवायची यातूनच प्रशासनाने कुठेतरी सहकार्य म्हणून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला तरी तो अपुराच पडायचा. आज ब्रह्मगाव या ठिकाणी यापूर्वी झालेल्या मौज तलावातून पाणीपुरवठा योजनेत देखील पूर्ण झालेले आहे. मात्र तलावतच पाणी नसल्यामुळे या योजनेचा फायदा गावकर्यांना झाला नव्हता. मात्र आता नाविन्यपूर्ण योजना मधून परिसरातील शिवनी या ठिकाणाहून थेट पाईपलाईन या गावाशी जोडल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्याची समस्या दूर झाली आहे.

दिवंगत सरपंच सुभाष डावकर यांचे खरे स्वप्न होते की ब्रह्मगाव मौज या गावाला कसल्याही परिस्थितीत पिण्याचे पाणी कमी पडू देणार नाही. माता भगिनींच्या डोक्यावरील हंडा घागर मी उतरल्याशिवाय राहणार नाही असा दृढ निश्चय त्यांनी केला होता. मात्र काळाने घात केला दिवंगत स्वर्गीय सरपंच सुभाष काका डावकर आणि त्यांच्या पत्नी यांचा अपघाती मृत्यू झाला. दुर्दैवाने हे त्यांचे स्वप्न अपुरे राहिले होते. आज दोन पंचवार्षिक पूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याने त्यांचे गावातील लोकांना पाणी पुरवण्याचे स्वप्न अधुरं राहिलं होतं. त्यानंतर त्यांचे चिरंजीव सरपंच संदीप सुभाष डावकर यांनी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून ही योजना मंजूर करुन घेवून शिवनी ते मौज ब्रह्मगाव या सात किलोमीटर अंतरावर ही पाईपलाईन असून मौज-ब्रह्मगावच्या नागरिकांना पाहिजे तितका पाणी पुरवठा होत आहे. यामुळे येथील नागरिक समाधान व्यक्त करत आहेत.

> सरपंच संदीप डावकर म्हणतात की वडील अपघातात गेल्यानंतर त्यांचे स्वप्न मला पूर्ण करण्याचे भाग्य लाभलं आणि ते पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्न केले. त्या प्रयत्नातून आज वडिलांचे स्वप्न साकार झाले आणि गोरगरीब महिलांचे, वृद्ध-वडीलधार्या नागरिकांचे ऋण मी वडिलांचे स्वप्न पूर्ण करून फेडले आहे.

> मौज ब्रह्मगावचे ग्रामसेवक रवींद्र सातपुते आणि सरपंच संदीप डावकर यांनी सर्वसामान्यांच्या यातना लक्षात घेऊन या पाणीपुरवठा योजनेला यशस्वी केले आहे. त्यामुळे त्यांचे गावातील नागरिक आणि महिलांकडून कौतुक केले जात आहे. महिलांच्या डोक्यावरचा हंडा उतरला असून आता थेट आमच्या दारात पाणी येत असल्याचे समाधान येथील महिला आणि नागरिक व्यक्त करताना पाहायला मिळतात.

> गेल्या अनेक वर्षापासून पावसाचे प्रमाण कमी झाल्यानंतर पाण्याच्या भीषण समस्येला सामोरे जावे लागत होते मात्र या योजनेमुळे आता आम्हाला मुबलक असे पाणी मिळत आहे. याशिवाय महिलांचा पाणी आणण्यासाठी रानोमाळ भटकंती होत नाही. त्यांना होणारा त्रास आता बंद झाला आहे. यामुळे आम्हाला समाधान असल्याचे मत येथील वृद्ध महिला कस्तुरा सोनवणे यांनी व्यक्त केले.



## जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्यावतीने घिसाडी समाजातील महिलांचा सत्कार

कडा । वार्ताहर

भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या वतीने कडा येथील कष्टकरी आणि ऐरणीवर घाव घालणाऱ्या घिसाडी समाजातील महिलांचा सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख हे प्रत्येक वर्षी आगळयावेगळया पद्धतीने महिला दिन साजरा करतात यापुर्वीही भाजीपाला विकणाऱ्या व बांधकाम मजूर महिलांना सन्मानित करण्यात आले होते. प्रत्येक वर्षी नाविन्यपूर्ण पुर्ण महिला दिन शंकर देशमुख यांच्या वतीने साजरा केला जातो. सौ. गिरीजा देशमुख व सौ. शकुंतला पवळ यांनी सर्व महिलांना हळदीकुंकू लावून तसेच शेला व पुष्पहार देऊन सन्मानित केले. कडा गावातील घिसाडी समाजातील एकुण १५ महिलांचा सन्मान करण्यात आला.

शिक्षिका, डॉक्टर व इतर उच्चशिक्षित महिलांचा सन्मान नेहमी होतो, परंतु देशमुख यांनी पुरुषांबरोबर कष्ट करणाऱ्या व ऐरणीवर घाव घालणाऱ्या आणि मान सन्मानापासुन दुर असणाऱ्या घिसाडी समाजातील महिलांचा सत्कार केला. कडा येथील भारतीय जनता पार्टी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमास हरिश्चंद्र बोडखे, राजु शिंदे, राजाभाऊ भंडारी, वेदांत देशमुख, महेश कर्डीले, अशोक खंदारे, शास्त्री, सोमनाथ आपरे व इतर उपस्थित होते.

## न्यायालयीन निणयाप्रमाणे व शासन निणयाप्रमाणे केंद्रप्रमुख पदोन्नती कराव्यात : जाधवर

बीड । प्रतिनिधी

आमरण उपोषण जिल्हा परिषद बीड अंतर्गत शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख व ग्रेड मुख्याध्यापक पदोन्नती सन २०२४ २५ पासून प्रलंबित आहेत. शिक्षण विभाग व सामान्य प्रशासन विभागातील कर्मचारी व अधिकारी यांच्या नकारात्मक भुमीकेमुळे पदोन्नत्या प्रलंबित राहिल्यामुळे पदोन्नती पात्र शिक्षक पदोन्नती विना सेवानिवृत्त झाले, तसे तसेच पदोन्नत्या होत नसल्यामुळे दर महा सेवानिवृत्त होत आहेत. व त्यांना नियमानुसार मिळणाऱ्या पदोन्नती हक्का पासून वंचित राहत आहेत. ही बाब शिक्षक पदोनती संघर्ष समन्वय समितीने वेळोवेळी लेखी निवेदनाद्वारे व प्रत्यक्ष भेटीद्वारे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. या पुर्वी ही जुलै २०२४ मध्ये पदोनती संघर्ष समितीने जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण केले होते. शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी ऑगस्ट अखेरपर्यंत ग्रेड मुख्याध्यापक पदोन्नती करण्यात येतील तसेच न्यायालयीन निणयाच्या अधिन राहुन केंद्रप्रमुख पदोनती करण्यात येतील असे लिखित पत्र दिलेले आहे. परंतु केंद्रप्रमुख पदोनती व मुख्याध्यापक पदोनती बाबत कार्यवाही शुन्य आहे. दिनांक २०.०२.२०२५ च्या उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद च्या न्यायालयीन निणयाप्रमाणे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई. महाराष्ट्र शासनाच्या शासन आदेशाप्रमाणे सेवाजेष्ठते नुसार केंद्रप्रमुख पदोन्नती दिनांक २७.०३.२०२५ पुर्वी करण्यात येऊन न्यायालयाला अहवाल सादर करण्याचे न्यायालयीन आदेश आहेत.



परंतु या आदेशाचा चुकीच्या पद्धतीने अन्वयार्थ काढून जिल्हा परिषदे कडून ध चा मा करण्यात येत आहे. न्यायालयीन, निणयामध्ये विषय निहाय तसेच सेवाजेष्ठतेनुसार वेगवेगळ्या यादया बनवुन न्यायालयास सादर करा असा उल्लेख न्यायलयीन आदेशामध्ये नाही. परंतु जिल्हा परिषद प्रशासनाच्या भूमकेमुळे निश्चित पणेच दिशाभूल होत आहे. या पुर्वीचा प्रशासनाचा अनुभव लक्षात घेता जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय शिक्षक पदोनती संघर्ष समितीने घेतलेला आहे. सदरिल आमरण उपोषणाच्या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री ना. अजित दादा पवार, मा. ना. जयकुमार गोरे, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पंकजाताई मुंडे, आमदार सुरेशजी धस, विजयसिंहजी पंडीत, नामिताताई मुंदडा, प्रकाशदादा सोळंके, संदिप भैय्या क्षिरसागर, ग्रामविकास सचिव, शिक्षण सचिव जिल्हाधिकारी बीड यांना देण्यात आलेल्या आहेत.

प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी व दिनांक:११.०३.२०२४ पुर्वी केंद्रप्रमुख पदोन्नती करणाकरिता प्राथमिक सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करावी. ग्रेड मुख्याध्यापक पदोन्नती तात्काळ कराव्यात, शिक्षण विस्तार अधिकारी पदोन्नती करण्यात. पदोन्नती संघर्ष समिती प्रशासनास सहकार्य करण्यास सकारात्मक आहे. आमरण उपोषणाची वेळ आणू नये सर्व उपोषण कर्ते हे वयोगट पंचावन च्या पुढील आहेत. कांही ची सेवा निवृती तर मार्च अखेरिस आहे. सेवाजेष्ठ शिक्षक त्रस्त झालेले आहेत. विहित मुदतीत तात्काळ पदोन्नत्या कराव्यात, नसता दिनांक :१२.०३.२०२५ बुधवार पासुन जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचे लेखी निवेदन मा मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्रा) यांना दिले आहे. सदरिल निवेदनावर राजेंद्र खेडकर, नामदेव शिंदे, श्रीराम बहीर, हरिदास घोगरे, सुरेश पवार, अनिल जाधवर, अर्जुन बारगजे, प्रकाश अहिरे, दादासाहेब जायभाये, विष्णू मुळे, एकनाथ राहिंज, लक्ष्मीकांत अवढाळ यांच्या स्वाक्षरी आहेत.

## ग्रामऊर्जा फाउंडेशनच्या वतीने उत्साहात महिला दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

ग्रामऊर्जा ह्युमन डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या वतीने आंबेजोगाई तालुक्यातील दगडवाडी, गजानन वस्ती, धारूर तालुक्यातील आवरगाव, कोळपिंपरी येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने गावातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे शिबिर सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून डॉ. दिपाली गिराम यांनी पार पाडले.



आंबेजोगाई व धारूर तालुक्यातील कर्तुत्वान महिलांनी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली होती त्यांनी त्यांच्या स्वतःचे आयुष्यातील अनुभव सर्व महिलांसोबत व्यक्त केले. पालकांना देखील आपल्या मुलींना अशाच प्रकारचे शिक्षण देऊन मोठ्या पदावर नेण्याची इच्छा त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती.

महिला दिनाचे औचित्य साधून विविध खेळांचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विजेत्या महिलांना ग्रामऊर्जा संस्थेच्या वतीने मिल्टनच्या बाटल्या प्रदान करण्यात आल्या. यामुळे महिलांचा उत्साह अधिकच वाढला. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. या वेळी गावाच्या सरपंच, उपसरपंच, शिक्षण समिती सदस्य, ग्रामऊर्जा टीम, मुख्याध्यापक सहशिक्षिका, ग्राम हुनर फेलो ज यांच्यासह गावातील सर्व महिलांनी कार्यक्रमासाठी उपस्थिती लावली. या कार्यक्रमामुळे महिलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली तसेच त्यांच्या सहभागामुळे सामाजिक एकजूट देखील दृढ झाली. त्यासोबतच शिक्षणाचे महत्त्व महिलांच्या आयुष्यात किती आणि कसे आहे हे देखील अनुभवायला मिळाले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामऊर्जा ह्युमन डेव्हलपमेंट फाउंडेशनने विशेष प्रयत्न केले.



बीड – जागतिक महिला दिन व प्रत्येक वर्षी याच दिवशी येणारा आमच्या भगिनी परमार्थ प्रेमी, कुशल संघटक, आदिशक्ती विधवा महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती लताताई मस्के यांचा वाढदिवस.. व या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या निवासस्थानी भेटुन त्यांना उदंड आयुष्याच्या भरभरून शुभेच्छा देताना नातेवाईक.

## ज्ञानदीप विद्यालयात जागतिक महिला दिन साजरा

धारुर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्रामध्ये जागतिक महिला दिनानिमित्त विद्यालयांमध्ये माता पालक मेळावा तसेच कर्तृत्ववान व होतकरू माता पालकांचा सन्मान सोहळा व माता पालकांसाठी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रथमतः स्वराज्य जननी राजमाता माता जिजाऊ व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयातील माता पालक सुरेखा आगे तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयातील पालक अर्चना शेळके, माया जाधव, अनुसया उडगे, छाया शेंडगे, सुरेखा सोनटक्के, सुरेखा वाकुडे, अनिता जाधव उपस्थित होते.



उपस्थित मान्यवरांचा व विद्यालयातील शिक्षकांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व लेखणी देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर माता पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले व नंतर माता पालकांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धे मध्ये प्रथम, द्वितीय तृतीय येणाऱ्या माता पालकांना विद्यालयाच्या वतीने बक्षीस देण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयातील शिक्षिका वर्षा साळवे मॅडम, प्रस्ताविक मनिषा तिडके मॅडम, तर आभार प्रदर्शन स्नेहल शिनगारे मॅडम यांनी केली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



टाकरवण । जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून माजलगाव तालुक्यातील टाकरवण येथील ग्रामपंचायत कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांचा सत्कार करण्यात आला. तर, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत स्पर्धा घेण्यात आल्या. प्राथमिक शाळेमध्ये रांगोळी वकृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन करून जागतिक महिला दिन उत्साहामध्ये साजरा करण्यात आला यावेळी विद्यार्थिनी, महिला, शिक्षक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेना उबाठाच्या वतीने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा : मोरे, खेडकर

शिरूर कासार । प्रतिनिधी

शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त शिरूर शहरातील नगरपंचायत मध्ये काम करणाऱ्या माझ्या माता भगिनींचा राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब यांच्यासह अहिल्यादेवी होळकर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा देऊन शिरूर शहरातील नगरपंचायत मध्ये काम करणाऱ्या माझ्या गोरगरीब माता-भगिनींचा सन्मान सत्कार करण्यात आला.

महिला दिन सन्माननीय जिजामाता चौक वंदनीय माता-भगिनी तसेच येथे उपस्थित स्वतःच्या अस्तित्वासाठी आजही लढणाऱ्या सर्व तमाम महिला भगिनींना प्रथम तुम्हा सर्वांना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दरवर्षी ८ मार्च हा दिवस जगभर जागतिक महिला दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो तोच शिवसेनेच्या वतीने शिरूर कासार शहरांमध्ये देखील मोठ्या उत्साहाने शिरूर कासार तालुक्यातील जिजामाता चौकामध्ये महिला जागतिक दिनानिमित्त या देशातील सर्वच राजमातांच्या प्रतिमा शिरूर शहरातील माता-भगिनींना देऊन माझ्या सर्व माता-भगिनींचा सन्मान शिवसेनेच्या वतीने करण्यात आला व यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांच्या पत्नी सविता मोरे यांनी जागतिक महिला दिनानिमित्त हळदीकुंकू लावून शाल श्रीफळ देऊन शिरूर शहरातील नगरपंचायत मधील साफसफाई करणाऱ्या माझ्या माता भगिनी यांचा सन्मान देखील करण्यात आला जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहाने साजरा केला यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व सविता सोपान मोरे व सर्वच मित्र कंपनी उपस्थित होते.



जगभरात ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा केला जातो या दिवशी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सत्कार केला जातो त्यांचा कार्याचा गौरव केला जातो तसेच तमाम महिला वर्गाला त्यांच्या स्वतंत्र्याची जाणीव होण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो महिला दिनाला शिरूर कासार तालुक्यामध्ये यावर्षीपासून चांगली सुरुवात केली आहे यापुढे दरवर्षी जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा शिवसेनेच्या वतीने केला जाईल. आंतरराष्ट्रीय महिला दिन हा दरवर्षी ८ मार्च रोजी साजरा केला जाणार एक सुट्टीचा दिवस आहे हा दिवस लिंग समानता पुनरूत्पादक हक्क आणि महिला वरील हिंसा आणि अत्याचार यासारख्या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करतो महिलांचा हक्क चळवळतील केंद्रबिंदू म्हणून हा दिवस पाळला जातो हा दिवस २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात उत्तर अमेरिका आणि युरोप मधील कामगार चळवळीतील मधून सुरू झाला. फेब्रुवारी १९०९ रोजी निवार शहरातील सोशॅलिस्ट पार्टी ऑफ अमेरिकन आयोजित केलेला महिला दिन हा सर्वात पहिला दिवस होता यामुळे १९१० च्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद जर्मनी प्रतिनिधी एक विशेष महिला दिन दरवर्षी आयोजित करण्याचा प्रस्ताव ठेवण्यास प्रेरित केले पण यावेळी कोणताही निश्चित तारीख ठरली नाही पुढील वर्षी संपूर्ण युरोपमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे साजरा झाला १९१७ मध्ये रशियन क्रांतीनंतर ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन निमित्त राष्ट्रीय सुट्टी देण्यात आली त्यानंतर समाजवादी चळवळ आणि कम्युनिस्ट देशांनी त्या तारखेला तो दिवस साजरा केला १९६० च्या दशकात उत्तरर्धात जागतिक श्री वादी चळवळीने त्याची स्वीकार होईपर्यंत ही सुट्टी डाव्या चळवळी आणि सरकारांशी संबंधित होती १९७७ मध्ये संयुक्त राष्ट्र ने केलेले जाहिरातीनंतर जागतिक महिला दिन हा मुख्य प्रवाहातील जागतिक सुट्टी बनली.

# महिलांचा सन्मान होणे हाच जागतिक महिला दिन साजरा करणे आहे : माजी आ. आंधळे

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ बीड जिल्हा, वडवणी तालुका यांच्या वतीने स्त्री शक्ती सन्मान सोहळा

वडवणी । प्रतिनिधी

आपला भारत देश हा पुरुषप्रधान जरी असला तरी आजच्या काळात महिला या प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने आहेत त्यामुळे महिलांची प्रगती व सन्मान होणे हाच खऱ्या अर्थाने जागतिक महिला दिन म्हणून साजरा करणे आहे असे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई बीड जिल्हा व वडवणी तालुका यांच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी येथे आयोजित केलेल्या स्त्री शक्ती सन्मान सोहळ्या निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या वेळी माजी आमदार केशवराव आंधळे यांनी मांडले आहे.




महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा बीड जिल्हा व वडवणी तालुका यांच्यावतीने काल दिनांक ८ मार्च शनिवार रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी सभागृहात जागतिक महिला दिनानिमित्त स्त्री शक्ती सन्मान सोहळ्याचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार केशवराव आंधळे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून बाजार समिती सभापती संभाजी तात्या शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख विनायक बाप्पा मुळे, मधुकररावजी धस सर, लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष अँड राज पाटील, सचिव गोविंदराव आंधळे, जिल्हाउपाध्यक्ष प्रकाश आबा काशिद, जिल्हा उपाध्यक्ष सोमेश्वर सोनटक्के हे उपस्थित होते. यावेळी प्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विविध विविध क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या, कर्तुत्वान महिलांचा शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र, पुस्तक व झाड देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मधुकरराव धस सर, विनायक बाप्पा मुळे यास इतर महिलांनी आपापले मनोगत व्यक्त केले. यावेळी अध्यक्ष समारोप भाषणात बोलताना माजी आमदार केशवराव आंधळे म्हणाले की महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित केलेला स्त्रीशक्ती सन्मान सोहळा कार्यक्रम हा अभिमानास्पद असून तालुक्यातील पत्रकार हे सदैव विविध विकासाच्या बातम्या वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करून विकास कामांमध्ये भर घालण्यासाठी प्रयत्न करत असतात पत्रकारामुळेच आज वडवणी तालुक्यात विकास होत आहे असे ते म्हणाले.

यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मुंबई जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव, तालुका अध्यक्ष अशोकराव निपटे, डिजिटल मीडिया तालुकाध्यक्ष सतीशराव मुजमुले, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती तालुका अध्यक्ष प्राध्यापक श्रीनिवास काकडे, उपाध्यक्ष शांतिनाथ जैन, तालुका सचिव अर्जुन मुंडे, डिजिटल मीडिया तालुका उपाध्यक्ष शेख एजाज, शंकर झाडे, शंकर जाधव, अशोक फपाळ, ज्ञानेश्वर लंगे, विष्णु डोईफोडे, गंगाभिष्म आंडील, अंकुश गवळी इत्यादींनी परिश्रम घेतले. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोकराव निपटे व आभारप्रदर्शन अँड विनायक जाधव यांनी केले. या कार्यक्रमाला बाजार समिती पदाधिकारी, कर्मचारी यासह अनेक जण उपस्थित होते.

जागतिक महिला दिनानिमित्त रुक्मीन नागापुरे एकल महिला संघटना बीड, चंद्रकला म्हैत्रे बाल प्रकल्प अधिकारी, छायाताई आंधळे सरपंच रुईपिंपळा, ज्योती शिंदे, कावेरी घुले, प्रमिलाताई माळी शिवसेना महिला आघाडी जिल्हा संघटक, शीलाताई उजगरे प्रहार संघटना जिल्हाध्यक्ष, समशाद शेख, गीतांजली लव्हाळे पत्रकार, कौशल्य कदम, रुक्मीन शिंदे, मनीषा उजगरे इत्यादी महिलांचा सन्मान करण्यात आला.



# स्त्री समानता केवळ हक्काची नव्हे तर जबाबदारीची बाब : जयमाला साबने

चौसाळा । प्रतिनिधी

जागतिक महिला दिन ८ मार्च रोजी जगभरात साजरा केला जातो. हा दिवस महिलांच्या अधिकारांचे, योगदानांचे आणि त्यांच्या सक्षमीकरण, त्यांचे हक्क, सामाजिक आर्थिक व धार्मिक क्षेत्रातील समानता अबाधित राखण्यासाठी हा दिवस महत्वाचा असतो. त्यामुळे महिला समानता ही केवळ हक्काची नव्हे तर जबाबदारीची बाब आहे असे प्रतिपादन श्रीमती जयमाला साबने यांनी केले. नवगण शिक्षण संस्थेच्या कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे राष्ट्रीय सेवा योजना व विशाखा समिती तर्फे जागतिक महिला दिनानिमीत्त लिंगभाव समानता या विषयावर त्या बोलत होत्या. पुढे बोलताना श्रीमती साबने यांनी महिलांच्या आजपर्यंतच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. पदव्युत्तर संचालक डॉ. सुधाकर वनवे म्हणाले की महिलांची समानता आपल्या घरापासूनच सुरुवात करावी. ज्या कुटूंबात महिलांचा सन्मान केला जातो त्यांची प्रगती झालेली आहे. अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. विलास भिल्लारे म्हणाले की पुरुष आणि महिला यांच्यातील समानतेच्या दिशेने पाऊल उचलताना प्रत्येकाने सकारात्मक कृती व विचार केला पाहिजे. सुत्रसंचलन व प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. शाहीन सय्यद यांनी महिलांचे नेतृत्वगुण व विकासासाठी सकारात्मक विचार होणे अत्यंत गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. या प्रसंगी श्रीमती सारीका सवाई, प्रा. डॉ. मंजुषा रसाळ, प्रा. स्वाती हंगे, प्रा. आफरीन सय्यद यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तु देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. संजय कदम यांनी केले तर संपुर्ण नियोजन कार्यक्रमाधिकारी डॉ. अमर आलदे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# वाढीव टप्पा निधीची अर्थसंकल्पात तरतूद करा

## बीड जिल्हा विनाअनुदानित कृती समितीचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात १४ ऑक्टोबरच्या निर्णयाची अंमलबजावणी करून टप्पा वाढीसाठी निधी मंजूर करा अशी मागणी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री अर्थमंत्री आणि शिक्षणमंत्री यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली.



१४ ऑक्टोंबरच्या शासन निर्णयानुसार वाढीव टप्पा अनुदानासाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा संघटनेच्या वतीने गेली पाच महिन्यांपासून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. परंतु सरकारने मात्र विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या टप्पा वाढ अनुदानाची मागणी गांभीर्याने न घेता सातत्याने दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या सर्व राज्यातील विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनी संपूर्ण राज्यासह बीड जिल्ह्यात जेल भरो आंदोलन आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनासाठी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांकडे रीतसर परवानगी मागितली परंतु पोलिसांनी बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना जेलभरो आंदोलनासाठी परवानगी नाकारली. पोलिसांनी जेलभरो आंदोलनाला परवानगी नाकारल्या नंतर आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम असलेल्या विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शांततेच्या सनदशीर मार्गाने आपल्या मागण्यांच्या संदर्भातल्या शासनाला निवेदन सादर करण्याची पोलिसांनी विनंती केली. पोलिसांच्या या विनंतीला मान देऊन मराठवाडा विभागाचे विभागीय अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे निरीक्षक विजयसिंह शिंदे बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, बीड तालुकाध्यक्ष भागवत यादव यांच्या सह जिल्हा कार्यकारणी सदस्य विश्वनाथ मुंडे आणि महेंद्र वाघमारे यांनी जिल्हाधिकारी यांच्या दालनामध्ये जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दुसरे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार आणि शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनावर बीड जिल्हा शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान बीड जिल्ह्यासह राज्यातील सर्व विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाकडे लक्ष लागले आहे.




# शहापूर मजरा जि.प. शाळा व ग्रामपंचायत कार्यालय येथे जागतिक महिला दिन साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत कार्यालय शहापूर मजरा येथे ०८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला या वेळी गावातील महिलांनी एकत्र येऊन सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्व महिलांचा सन्मान करण्यात आला.

शाळेचे मुख्यद्याप श्री संतोष साबळे सर यांनी महिला सशक्तिकरण, बालविवाह प्रतिबंध, किशोर मुलींना द्यायचा आहार, बालविवाह दुष्परिणाम याबाबत माहिती देण्यात आली.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यामार्फत रांगोळी स्पर्धा चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी उपस्थित सरपंच सौ उज्वला आळणे, ग्रामपंचायत सदस्य सौ. कालिंदा गाढवे, बचत गटाच्या सौ. मनीषा साखरे, सौ प्रियंका गाढवे, सौ पूजा आळणे, सौ राजकन्या गाढवे, सौ.मंगल शेळके इत्यादी महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. यावेळी शाळेचे शिक्षक अप्पासाहेब चव्हाण सर, महादेव चव्हाण सर विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# आधार व्यसनमुक्ती केंद्रामधे जागतिक महिला दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

दि.०८ मार्च २०२५ रोजी आधार व्यसनमुक्ती केंद्रामधे जागतिक महीला दिन वेगळ्या उपक्रमाने उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी केंद्र संचालक तेजसनाना घुमरे, डॉ. रमाताई गिरी, संतोषजी गर्जे व बाजीराव ढाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या अनोख्या कार्यक्रमात जिल्हा रूग्णालय बीड येथील विवीध विभागाच्या प्रमुख रणरागिणींचा सत्कार करण्यात आला. यामधे डॉ.रमाताई गिरी (नर्सिंग सुपरीटेंडेंट), शकुंतला सुतार (लेबर होम इनचार्ज), शारदा डहाळे (नर्सेस हॉस्टेल इनचार्ज), द्वारका खाडे (सोनोग्राफी सेंटर इनचार्ज), शिला कुलकर्णी (खउण इनचार्ज), विद्या गायसमुद्रे (डायलिसीस इनचार्ज), रेखा गोतावळे (मेल सर्जिकल इनचार्ज), पुजा ठोंबरे (केंद्र परीचारीका), गौरी घुमरे यांच्या अतुलनिय कार्याबद्धल जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी तेजसनाना यांनी सत्कारमुर्ती रणरागिणी, केंद्रातील सर्व कर्मचारी व रूग्णांना मार्गदर्शन केले. यावेळी सत्कारमुर्ती रणरागीणी या सेवाभावी वृत्तीने रूग्णासोबत कसलाही भेदभाव न करता सेवा देतात तसेच रूग्णांना शारिरीक व मानसिक दोन्ही दृष्टीने सशक्त बनवतात म्हणुन तुमच्या सेवेपुढे आजच्या जागतिक महिला दिनी नतमस्तक होतो असे म्हणाले. यावेळी सत्कारमुर्तीनीही मार्गदर्शन केले. यात प्रामुख्याने डॉ.रमाताई गिरी या बोलताना




म्हणाल्या की, व्यसन ही समाजाला लागलेली किड आहे. व्यसनाधिन माणसामुळे कुटुंब उध्वस्त होते. यामुळेच व्यसनापासुन दुर राहा. या कार्यक्रमास तेजसनाना घुमरे, संतोषजी गर्जे, बाजीराव ढाकणे केंद्र अधिक्षक श्री.संजयजी भडगळे, केंद्र समुपदेशक श्री गणेश जाधव, केंद्र परीचारीका काशिद पुजा, काळजीवाहक औदुंबर भावठाणकर आदी कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक गणेश जाधव सुत्रसंचालन बाजीराव ढाकणे यांनी तर आभार प्रदर्शन संजयजी भडगळे यांनी केला.

# घरगुती जेवण सर्व्हिसेसच्या माध्यमातून उद्योजक महिलेचा 'चविष्ट प्रवास'

गेवराई । प्रतिनिधी

परिस्थिती काहीही असो, वय कितीही असो, मात्र एखादी गोष्ट ठरवली की, आपण सर्व अडचणींवर मात करून यश प्राप्त करू शकतो. यातच जर कुटुंब आणि घर सांभाळणाऱ्या महिला असतील आणि त्यांनी काहीतरी करण्याचं ठरवलं, तर त्या आपल्या जिद्दीच्या बळावर सगळ्या अडथळ्यांचे डोंगर पार करून यश मिळवतात असो ८ मार्च हा दिवस महिलांच्या हक्कांचा, त्यांच्या संघर्षांचा आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो. हा दिवस महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि प्रगतीचा उत्सव असतो. तसेच, हा दिवस समानतेच्या दिशेने पुढे जाण्यासाठी प्रेरणा देतो.महिला दिन हा महिलांच्या संघर्षाचा आणि त्यांच्या यशाचा गौरव करणारा दिवस आहे.



घरगुती जेवण सर्व्हिसेसच्या माध्यमातून गेवराई शहरातील सुतार गल्ली येथील रहिवासी असलेल्या महिला उद्योजक म्हणून सर्वगुणसंपन्न काम करणाऱ्या सौ.शारदा शिवाजीराव चन्ने यांनी केलेल्या उत्कृष्ट स्वयंपाकाने विद्यार्थ्यांसह सर्वांची भूक भागवून आत्मारामाची तृप्ती करणारी. कडाडून भूक लागली असताना स्वादिष्ट, रुचकर आणि आरोग्यदायी अन्न कमीत कमी वेळात स्वतःच्या हाताने करून देणे ही खरोखरी भाग्याची गोष्ट आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे फक्त शिक्षण, नोकरी व्यवसाय निमित्ताने घराबाहेर आलेल्या गरजवंतांची, भुकेल्याची भूक भागविण्याचे पुण्य त्या माऊली कमावतात अणि स्वयंपाकाची मनापासून आवड आणि रोजचेच पदार्थ अधिक रुचकर जेवण बनविण्याची त्या सातत्याने मेहनत घेतात त्यांच्या मनात उद्योग महत्वाचा असून गरजू ग्राहकांना अन्न पुरविणे हे समाधान त्यांना वाटतं की ग्राहक आनंदी असेल तर हेच समाधान अनेक पटीने वाढते म्हणून घरगुती जेवणात तेल, मसाले यांचा वापर कमीच असतों पदार्थ जळजळीत होणार नाही आणि रोजचे जळजळीत खाणे ग्राहकाला पोटाला मानवत नाही. त्याचबरोबर पदार्थ व्यवस्थित शिजलेले भाजलेले देणे, दररोज सकाळी आणि संध्याकाळी अशी काळजी घेऊन ताजे पदार्थ देण्याकडे लक्ष ठेवणे सुद्धा फायद्याचे ठरते. कारण समाधानी ग्राहक हीच यशाची गुरुकिल्ली आहे.कोणत्याची परिस्थितीत जेवण चवदार असेल आणि चांगल्या क्वालिटीचे जेवण देण्याचा मानस आहे त्यामुळे समाजाच्या अनेक लोकांत डब्याची ओळख अल्पवधीत पोहोचली त्यांचा फायदा व्यवसाय वाढीवर नक्की होईल अशी अपेक्षा.. सकाळ सायंकाळ असे दोन्ही वेळा डबे द्यायचे असतील तर सकाळचे काही तास आणि सायंकाळचे काही तास सातत्य ठेवून काम करीत आहेत आजकाल स्वस्त मध्ये रुचकर जेवण हवे असते. त्यांच्या खिशाला परवडेल असे जेवण हवे असते. असो सौ. शारदा शिवाजीराव चन्ने यांनी आपल्या संकल्पनेतून साकारलेल्या आपल्या व्यवसायाला घरातून शुन्यातून सुरुवात केली आणि व्यावसायिक म्हणून आपले विश्व निर्माण केले. स्वतःमधून काही ऊर्जा मिळवत त्याचे रूपांतर त्यांनी सुरू केलेल्या त्यांच्या घरगुतीमेस व्यवसायात झाले आहे. कुठल्याही प्रसंगाला घाबरून न जाता त्याकडे सकारात्मक दृष्ट्या बघून त्यातूनही व्यवसायाची संधी निर्माण करून दाखवली रणरागिणीचे रूप घेऊन आपल्या संसाराचा गाडा पुढे घेऊन जात चिकाटीने व आत्मविश्वासाने व्यवसाय चालू अखंडित ठेवला. चांगल्या प्रतीच्या गुणवत्तेने घरातून सुरू केलेला आहे.

लेखक – शुभम घोडके

# बीड न.प.च्या मालकीच्या अनेक भूखंडाचे बोगस पी.टी.आर. करून जागा भू माफियांनी लुटल्या

## जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या तक्रारीनंतर उपमुख्यमंत्र्यांचे चौकशीचे आदेश

बीड । प्रतिनिधी


बीड नगर पालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने बोगस पी.टी.आर.चा सुळसुळाट सुरु असून या आधारे शहरातील नगरपालिकेच्या मालकीचे भूखंड व महत्वाच्या ठिकाणचे ओपन स्पेस भू माफियांच्या घशात गेले असून उरलेले भूखंड ही घालण्याचा डाव नगर पालिकेने सुरु केला आहे. या संदर्भात शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केली होती. या प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दखल घेत बीडमधील बोगस पीटीआर, पीआर कार्ड प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत. यामुळे या रॅकेटमध्ये सहभागी असलेले पालिकेचे अधिकारी, कर्मचारी व भू माफिया चौकशीच्या फेऱ्यात अडकणार आहेत.

शहरातील भू माफियांनी नगर पालिका कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन शहरातील महत्वाच्या ठिकाणी असलेल्या ओपन स्पेस वर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे. एवढेच नाही तर कर्मचाऱ्यांना हाताशी करुन ओपन स्पेसचे बोगस पीटीआर आणि पीआर कार्डही काढले आहेत.

पालिकेच्या सोयीस्कर भूमिकेमुळे शहरातील ओपन स्पेस वर अतिक्रम करण्याचा उद्योग कायम सुरू असे चित्र बीडमध्ये पहावयास मिळत आहे. या प्रकरणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेचे मुख्यनेते तथा राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निवेदन दिले व बीडमध्ये पालिका कर्मचाऱ्यांच्या संगणमाताने सुरु असलेल्या बोगस पीटीआर व पीआर कार्डचा सुरु असलेला वापर याचे गांभिर्य पटवून दिले. या प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रधान सचिव यांना बीड नगर पालिकेतील बोगस पीटीआर, पीआर व अनाधिकृत अतिक्रमण करुन गिळंकृत केलेल्या ओपन स्पेस संदर्भात चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी लवकरच चौकशी समिती नेमण्यात येणार असून बोगस पीटीआरमध्ये हात बरबटलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह भूमाफियांना धडकी भरली आहे.

### बोगस पीटीआर चे रॅकेट उध्वस्त होऊन जागा पालिकेच्या ताब्यात देणार : मुळूक

शहर विकासाचे नियोजन करताना नागरिकांना सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम नगरपालिकेचे असते. मात्र तसे होत असल्याचे बीडमध्ये दिसत नाही. नगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडावर अतिक्रमण करून पालिकेत बोगस पीटीआर तयार करणाऱ्या भूमाफियांचे व कर्मचाऱ्यांचे रॅकेट सक्रीय आहे. मात्र आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले असून न.प.चा मालकीच्या भूखंड हडप करणारे भूमाफिया व पालिकेचे कर्मचारी चौकशीच्या फेऱ्यात अडकणार असून भूमाफियांचे रॅकेट उध्वस्त करून जागा पालिकेच्या ताब्यात देणारच असे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी म्हटले आहे.



# महिला दिनाच्या दिवशी रक्षकच बनला भक्षक

### खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत, पोलिसाकडून महिलेवर बलात्कार

गेवराई । प्रतिनिधी

पाटोदा पोलीस ठाण्याचे बीट अमलदार गडकर यांनी महिला दिनानिमित्त कार्यक्रमासाठी एका महिलेला बोलावून पाटोदा येथील स्टेट बँकेच्या बाजूला असलेल्या घरात घेऊन त्या महिलेवर बलात्कार केल्याची घटना पाटोद्यात घडल्याने खळबळ उडाली असून पाटोदा शहरात ह्या घटनेची जोरदार चर्चा होत आहे.पोलिसच अशा घटना करायला लागले तर सर्वसामान्यांनी विश्वास कुणावर ठेवायचा रक्षकच भक्षक झाल्याचे चर्चा सध्या पाटोद्यात सुरू आहे. घडलेल्या घटने संदर्भात पाटोद्यात संतप्त प्रतिक्रीया उमटत आहे



यासंदर्भात पाटोदा पोलिसांकडून प्राप्त माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील महिला मागील काही प्रकरणात पाटोदा पोलीस ठाण्यात ये-जा करीत असल्याने पाटोदा पोलीस ठाण्यातील बीट अमलदार उद्धव गडकर कर्मचाऱ्याच्या संपर्कात आली होती. यानिमित्ताने मोबाईल क्रमांकांची देवाणघेवाण झाली यातून त्यांच्यात संभाषण व मँसेज आदी होती याच संधीचा लाभ घेत त्या कर्मचाऱ्याने महिला दिनाचे निमित्त सांगुन त्या महिलेला पाटोदा येथे बोलावून घेतले होते ती महिला पाटोद्यात आली असता स्टेट बँक च्या बाजूला घेऊन जात महिलेवर बलात्कार केला. यावेळी त्या महिलेने आरडाओरड करण्याचा प्रयत्न केला मात्र तिला चोरीचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत बलात्कार केला.दुपारी १ वाजण्याच्या सुमारास ती महिला तक्रार दाखल करण्यासाठी पाटोदा पोलीस ठाण्यात येवून स्वतः पोलीस निरीक्षक यांच्या समोर सांगितले आहे. दुपारी १ वाजल्यापासून ती महिला पोलीस ठाण्यातच बसून होती घटनेची गांभीर्य पाहून पोलीस उपअधीक्षक बाळकृष्ण हुनगुडे पाटील यांनी पाटोदा पोलीस ठाण्यात भेट देत व तपासा संदर्भात सुचना केल्या संध्याकाळी ६-३० सुमारास त्या महिलेला वैद्यकीय तपासणीसाठी बीड येथे पाठविण्यात आले आहे. त्या पोलीस कर्मचाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पाटोदा पोलीस निरीक्षक जाधव साहेब करीत आहेत.



# भरदिवसा चोरट्यांनी व्यापाऱ्याचे दोन लाख रुपये केले लंपास

गेवराई । प्रतिनिधी

अहो साहेब तुमचे पैसे खाली पडले असे म्हणत गेवराईतील एका व्यापा-याचे दोन लाख रुपये लंपास केल्याची घटना मोंढा भागात काल पाच वाजेच्या सुमारास घडली असून, चोरटे सिसिटीव्हीत कैद झाल्याने पोलीस तपासात गती मिळेल अशी अपेक्षा आहे. गेवराईतील धोंडराईच्या प्रकाश शेट्टी यांचे गेवराई शहरातील मोंढा भागात बी-बीयाणे तसेच सिमेंट,पत्रा व स्टीलचे दुकान आहे. काल शुक्रवारी या दुकानातील मुनीम वैभव लाड यास दोन लाख रुपये बँकेतून आणण्यासाठी पाठवले.

लाड याने दोन लाख रुपये बॅक खात्यावरून काढलेली रक्कम एका कापडी पिशवीतून दुकानाकडे दुचाकीवरुन जात असतानाच तोच त्यांच्या दोघे आले अहो साहेब, तुमचे पाचशे रुपये पाठीमागे पडलेत असे म्हणताच मुनीम वैभव लाड याने दुचाकीला अडकलेली कापडी पिशवी तशीच ठेवून गेला. अन् याच संधीचा फायदा घेत या चोरट्यांनी सदरील पिशवी घेऊन पोबारा केला. दरम्यान,सदरील प्रकार बाजार समितीच्या सिसिटीव्हीत कैद झाला असून, याबाबत गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जातीय तेढ निर्माण करणाऱ्या पोस्टवर असणार पोलिसांची नजर

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यापासुन बीड जिल्ह्यातील सामाजिक वातावरण पूर्णपणे दुषित झाले आहे. सोशल मिडीयावरून कोणीही वाटेल तशा पोस्ट करून समाजा-समाजात तेढ निर्माण करण्याचा आणि जातीय विष पसरविण्याचा प्रयत्न करत आहे. सोशल मिडीया चालविणाऱ्यांना कसलेही बंधन राहीले नाही. गेल्या दोन महिन्यात जातीय विष पसरविणाऱ्या, तणाव निर्माण करणाऱ्या आणि कायदा व सुव्यवस्थेत बाधा आणणाऱ्या लाखो पोस्ट सोशल मिडीयावर व्हायरल होत असल्याने बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी अशा वादग्रस्त पोस्ट करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला होता. यांनी मात्र एस. पी. साहेब, तुमच्या यंत्रणेने किती जणांवर गुन्हे दाखल केले. कुणा-कुणाला आत टाकले ? आणि किती अशा पोस्ट डिलेट केल्या?



याची माहिती जाहिर करायला हवी ? तरच अश्या वादग्रस्त पोस्ट टाकणाऱ्या वर जरब बसेल. बीडचे पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्यासह अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांनीही सोशल मिडीयावर वादग्रस्त आणि दोन समाजात तेढ निर्माण होणाऱ्या पोस्ट टाकु नये, अन्यथा कडक कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे.

वास्तविक पाहता अशा आवाहनाने व इशाऱ्याने काहीच होणार नाही. गेल्या दोन महिन्यात सोशल मिडीयावर लाखो पोस्ट व्हायरल झाल्या. ज्या पोस्टमधुन दोन समाजात प्रचंड तेढ निर्माण होईल, कायदा आणि सुव्यवस्थेला अडचण येईल, अशी वाक्य व्हायरल केली गेली. सध्या जिल्ह्यातील सामाजिक विषमता वाढविण्यास एकमेव सोशल मिडीयाच कारणीभुत आहे. साध्या-साध्या पोस्ट एकमेंकांच्या भावना दुखविण्यास कारणीभूत ठरू लागल्या आहेत. गेल्या दोन महिन्यात हे प्रमाण प्रचंड पाहायला मिळाले. बऱ्याचदा अशा पोस्टमुळे काही ठिकाणी वाद झाले तर काही ठिकाणी एकमेंकांविरूध्दची खुन्नस वाढल्याचे पाहायला मिळाले. मात्र पोलीसांनी अशा एकाही पोस्टवर कारवाई केलेली नाही. सध्या बीड अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांनी वादग्रस्त,समजत तेढ निर्माण होईल अश्या पोस्ट व्हायरल करू नका, केल्यास कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

# रक्षणकच भक्षक झाल्याने न्याय कोणाला मागायचा

बीड । प्रतिनिधी



**पाटोदा येथील घटनेचा मनसेकडून जाहीर निषेध**

**आरोपीला भर चौकात चाबकाचे फटके द्या - वर्षा जगदाळे**

पाटोदा पोलीस ठाण्याचे बीट अंमलदार उद्धव गडकर यांनी जागतिक महिला दिनाच्या दिवशीच एका महिलेवर बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बीट अंमलदार याच्यावर बलात्काराचा गुन्हा नोंद करण्यात आला असून अशा नालायक कायद्याच्या रक्षण कर्त्याला भर चौकात नग्न करून चाबकाचे फटके देण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी केली आहे.

पाटोदा पोलीस ठाण्यात बीट अंमलदार पदावर कार्यरत असणारे उद्धव गडकर यांच्याकडे कामानिमित्त एक महिला पोलीस ठाण्यात येत होती या संधीचा फायदा घेत महिलेचा मोबाईल क्रमांक घेत तिला मेसेज संभाषण द्वारे जाळ्यात ओढत तिला पाटोदा येथे बोलवून घेत तिच्यावर अत्याचार करण्यात आला. पीडित महिलेच्या फिर्यादी वरून बीट अंमलदार उद्धव गडकर यांच्या विरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. महिला दिना दिवशी असा दुर्दैवी प्रकार घडल्याने कायद्याच्या रक्षण कर्त्याला कठोर ती कठोर कारवाई करून त्याला भर चौकात नग्न करून चाबकाचे फटके मारण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या महिला विभागाच्या राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी केली आहे.

# जिल्ह्याच्या राजकारणात महिलांनी ठसा उमटवला

## डॉ.दिपाताई क्षीरसागर यांचे प्रतिपादन; परळीमध्ये महिला दिनानिमित्त चर्चासत्र

बीड । प्रतिनिधी

आजच्या युगात प्रत्येक क्षेत्रात स्त्री अग्रेसर आहे. बीड जिल्ह्यात स्व.केशरबाई काकू क्षीरसागर, स्व.विमलताई मुंदडा, खा.रजनी पाटील, मा.आ.उषाताई दराडे, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, मा.खा.प्रीतमताई मुंडे यांनी राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली. महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांची नोंद झालेली असून कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे, असे प्रतिपादन बीड येथील नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केले.



परळी येथील जवाहर शिक्षण संस्था संचलित वैद्यनाथ महाविद्यालय, नवगण शिक्षण संस्था संचलित नवगण महाविद्यालय, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, इनरव्हिल लेडीज क्लब, परळी वैजनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य पोलीस महिला ई-तक्रार या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे शनिवारी आयोजन जागतिक महिला दिनानिमित्त वैद्यनाथ कॉलेजमध्ये घेण्यात आले होते. याप्रसंगी बीड येथील नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर ह्या बोलत होत्या.

व्यासपीठावर अध्यक्ष लक्ष्मीबाई देशमुख ह्या होत्या. महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.विद्या देशपांडे, डॉ.दिपा क्षीरसागर, प्राचार्य डॉ.ए.आर. चव्हाण, प्राचार्य डॉ.मधुकर आघाव, श्रद्धा हालगे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ.वीरश्री आर्या यांनी केले. पुढे बोलताना डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी पूर्वीच्या काळात अनिष्ट रूढी परंपरा असल्या कारणास्तव स्त्रियांची परिस्थिती अत्यंत बिकट होती, परंतु सद्यस्थितीच्या काळात स्त्रियांना विविध प्रकारचे अधिकार प्राप्त झालेल्या होणे त्यांच्यात परिवर्तने घडून आली आहे. स्त्रियांनी चूल आणि मूल एवढाच कार्य न करता त्यांनी स्वकर्तबगारीने कार्य करावे. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच कायदा व शिक्षणाचा अधिकार स्त्रियांना प्राप्त झालेला आहे, असे सांगून आजच्या युगात स्त्रिया विविध क्षेत्रात अग्रेसर आहेत, असे त्या म्हणाल्या. प्राचार्य डॉ. विद्या देशपांडे यांनी शिक्षण क्षेत्रात महिलांनी उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे. त्याबरोबर मुलींनी स्वतःची काळजी स्वतःच घेतली पाहिजे असे मत याप्रसंगी व्यक्त केले. तसेच जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पोस्टर प्रदर्शन, जागर - गोंधळ, सेल्फी पॉइंट, लेक माझी सावली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषक देखील प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. कार्यक्रमात नवगण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मधुकर आघाव यांनी प्राचीन काळात व सद्यपरिस्थितीच्या काळात स्त्रियांची स्थिती कशा पद्धतीची आहे, याविषयीचे विवेचन केले. आभार प्राचार्य डॉ. ए.आर.चव्हाण यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ.मीना म्हेत्रे व प्राध्यापक रजनी शेटे यांनी केले. या कार्यक्रमाला तिन्ही महाविद्यालयातील प्राध्यापक महिला व विद्यार्थिनी व परळी शहरातील महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT